जनसंपर्क कक्ष
23 NOV 2022
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात मंगळवारी दिवसभर ढगाळ वातावरण राहिल्याने थंडी गायब झाली. शिवाजी विद्यापीठ परिसरात सायंकाळी आकाशात ढगांची अशी दाटी झाली होती.

पुढारी

# 'स्तुति' कार्यक्रमातून कुशल मुनष्य निर्मितीस मदत होईल : प्रा. चक्रबोर्ती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने 'स्तुति' कार्यक्रम घेण्याचे उचललेले पाऊल योग्य आहे. यातून कुशल मुनष्य निर्मितीस मदत होईल, असे मत आय. आय. टी. खरगपूरचे प्रा. पार्थसारथी चक्रबोर्ती यांनी व्यक्त केले.

भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, शिवाजी विद्यापीठ व नॉर्थ बेंगाल विद्यापीठ, दार्जीलिंग यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्तुति' २२ ते २८ नोव्हेंबर दरम्यान कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. नॉर्थ बेंगाल विद्यापीठ, दार्जिलिंग येथे सुरू झालेल्या 'स्तुति' कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी 'स्तुति' पीएमयू समन्वयक शिवाजी विद्यापीठाचे प्रा. आर. जी. सोनकवडे, नॉर्थ बेंगाल विद्यापीठाचे कुलगुरू, प्रा. ओम प्रकाश मिश्रा, प्रा. सुभाष रॉय, डॉ. पलश पॉल आदी उपस्थित होते.

नॉर्थ बेंगाल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ओम प्रकाश मिश्रा म्हणाले, अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा पुरेपूर उपयोग प्राध्यापक, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील व्यक्तींनी केला पाहिजे.

कार्यक्रमात विद्यापीठातील व संलग्न महाविद्यालयातील त्याचबरोबर देशभरातील जवळपास १२ राज्यांमधून ८० संशोधक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. स्थानिक समन्वयक पलश पॉल यांनी आभार मानले.

पुढारी

# महावीर अध्यासनास देणगी

कोल्हापूर : प्रा. कुमार भीमगोंडा पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी दहा हजार रुपये देणगी भगवान महावीर अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांचेकडे सुपूर्द केली. पाटील हे जयसिंगपूर महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक असून ते भूगोल या विषयाचे प्राध्यापक आहेत. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र.कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव मा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

पुढारी

# पहिल्या दिवशी 'विवेकानंद'चे वर्चस्व

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय फेन्सिंग स्पर्धा; १३२ खेळाडूंचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व कोल्हापूर जिल्हा तलवारबाजी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय तलवारबाजी स्पर्धेला डीवायपी साळोखेनगर कॅम्पसमध्ये प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी विवेकानंद महाविद्यालयाच्या मुलींनी स्पर्धेवर वर्चस्व राखले. त्यांच्या ज्योती सुतारने फॉईल प्रकारात व अनन्या जोशीने ईपीमध्ये, तर आजरा महाविद्यालयाच्या ज्योती सुतारने सेबर प्रकरात सुवर्णपदक पटकावले.

शिवाजी विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, डी. वाय. पाटील नॉलेज कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. अभिजित माने आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशनचे सचिव विनय जाधव यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी एस. के. पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील चव्हाण, डीवायपी अभियांत्रिकीचे फिजिकल डायरेक्टर डॉ. राजेंद्र रायकर, विद्यानिकेतन स्कूलच्या प्राचार्या शांती कृष्णमूर्ती, झोनल स्पोर्टस् सचिव भाऊसाहेब वडर, विद्यापीठ संघ निवड समितीचे प्रा. किरण पाटील, प्रा. महेश पाटील, प्रा. राहुल मगदूम उपस्थित होते. संयोजन सचिन पाटील, सतीश कोळी, प्रा. प्रवीण देसाई, सतीश कोळी व सहकाऱ्यांनी केले.

स्पर्धेचा अनुक्रमे निकाल असा : फॉईल मुली : ज्योती सुतार -सुवर्ण (विवेकानंद कॉलेज), तन्वी कुऱ्हाडे - रौप्य (जी. ए. कॉलेज सांगली), अनन्या जोशी - कांस्य (विवेकानंद कॉलेज). अनुजा ढबाले - कांस्य (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज).

सेबर - मुली : ज्योती सुतार - सुवर्ण (आजरा महाविद्यालय), श्लोका शिंदे - रौप्य (विवेकानंद कॉलेज), स्नेहल पाटील - कांस्य (विवेकानंद कॉलेज), अमृता तराळ - कांस्य (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज).

ईपी - मुली : अनन्या जोशी - सुवर्ण (विवेकानंद कॉलेज), श्लोका शिंदे - रौप्य (विवेकानंद कॉलेज), श्रेया शिंदे व सानिका कदम - कांस्य (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज).

23 NOV 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण अभ्यासक्रमांना मोठा प्रतिसाद

## एम.बी.ए., एम.एस्सी.ला (गणित) विद्यार्थ्यांची अधिक पसंती



**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्र विभागातील अभ्यासकेंद्रांना या वर्षी विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. आजपर्यंत दूरशिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांना सुमारे सहा हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. एम.बी.ए. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांना विद्यार्थी संख्या लक्षणीय आहे. लवकरच दूरशिक्षण केंद्राचा ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमही सुरू होत आहे.

शिक्षणापासून काही कारणांनी दूर गेलेल्यांना आपले शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्र सुरू केले. या माध्यमातून आतापर्यंत अनेकांनी आपले अर्धवट शिक्षण पूर्ण केले आहे; मात्र गेल्यावर्षी केंद्राला पूर्ण वेळ संचालक नसल्याचे कारण देऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दूर शिक्षण केंद्राला नवीन प्रवेश देण्यास मनाई केली होती. त्यानंतर प्रा. डॉ. डी. के. मोरे यांची संचालक म्हणून नियुक्ती केली.

या वर्षी दूर शिक्षण केंद्राने सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांत केंद्रांची संख्या वाढवली. ऑनलाईन प्रवेशामुळे प्रवेश प्रक्रिया सोपी आणि गतिमान झाली. पर्यायाने विद्यार्थ्यांचा प्रतिसादही वाढला. सध्या दूर शिक्षण केंद्राच्या माध्यमातून १० अभ्यासक्रम चालवले जातात. अद्यापही काही अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू आहेत. शिवाजी विद्यापीठाला नॅक मूल्यांकनात ए प्लस प्लस मानांकन मिळाल्याने विद्यापीठाचा समावेश कॅटॅगिरी एकमध्ये झाला आहे. त्यामुळे आता दूर शिक्षण केंद्राच्या एमबीए अभ्यासक्रमाला सहा वर्षे कोणतीही परवानगी नव्याने घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे या अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढत आहे.

**“ दूरशिक्षण केंद्राने प्रवेशप्रक्रिया, अभ्यासक्रमांची उपलब्धता, पुस्तके या सर्व बाबतीत सुसूत्रता आणली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा केंद्राच्या अभ्यासक्रमांना भरघोस प्रतिसाद मिळतो. सहा हजार प्रवेश आतापर्यंत झाले असून, प्रवेशासाठी विचारणाही होत आहे. लवकरच आणखी नवे अभ्यासक्रम केंद्राकडून सुरू केले जातील.**


- प्रा. डॉ. डी. के. मोरे, संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ

**“ दूरशिक्षण केंद्राने विद्यार्थ्यांना अनेक सुविधा दिल्या आहेत. केंद्राचा अभ्यासक्रम आणि पुस्तके चांगली आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळतो. लवकरच एमबीएचा ऑनलाईन अभ्यासक्रम आम्ही सुरू करणार आहोत.**

- प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### नवे सात अभ्यासक्रम सुरू होणार

दूरशिक्षण केंद्रातर्फे लवकरच सात प्रमाणपत्रे अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. याचा कालावधी सहा महिन्यांचा असेल. याचा लाभही विद्यार्थ्यांना घेता येणार आहे.




**दृष्टिक्षेपात प्रवेश**




**दृष्टिक्षेपात दूरशिक्षण केंद्र**

सकाळ



कुरुकली : येथील भोगावती महाविद्यालयात प्रा. नमिता पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. नंदकुमार मोरे, जयसिंगराव हुजरे, डॉ. रणधीर शिंदे, अजय कांडर, डॉ. डी. ए. चौगले.

# प्रा. पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**शाहूनगर :** मराठी साहित्यातील काव्यप्रकाराला एक नवी दिशा देणाऱ्या कवी अजय कांडर यांनी आपल्या कवितेतून ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांच्या भावना प्रभावीपणे मांडल्या आहेत. त्यांच्या कवितांची उत्कृष्ट चिकित्सा प्रा. नमिता पाटील यांनी आपल्या संदर्भ ग्रंथात केली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयात मराठी विभागाच्या प्रा. नमिता पाटील लिखित कवी अजय कांडर यांची कविता : चर्चा आणि चिकित्सा या संदर्भ ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भोगावती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष जयसिंगराव हुजरे होते. प्राचार्य डॉ. डी. ए. चौगले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सविता व्हटकर यांनी परिचय करून दिला. कवी कांडर यांनी आपल्या लेखन प्रवासाबाबत अनुभव सांगितले. या वेळी डॉ. रणधीर शिंदे, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव शिवराज नायकवडे. हुजरे प्रा. पाटील यांची भाषणे झाली. उपप्राचार्य डॉ. एन. एम. पाटील, आर. बी. हंकारे, दिग्विजय पाटील, पी. एस. पाटील, प्रा. डॉ. संजय साळोखे, अनिल पाटील उपस्थित होते. प्रा. वैशाली गुंजेकर यांनी आभार मानले. प्रा. व्ही. एम. पाटील व प्रा. पवन पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
23 NOV 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विभागीय फेन्सिंगमध्ये 'विवेकानंद' आघाडीवर

कोल्हापूर, ता. २२ : डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग साळोखेनगर व कोल्हापूर जिल्हा तलवारबाजी असोसिएशन यांच्यातर्फे आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय तलवारबाजी स्पर्धेला सुरुवात झाली. पहिल्या दिवशी विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरच्या मुलींनी स्पर्धेवर ठसा उमटवला.

विवेकानंदच्या ज्योती सुतार हिने फॉईल प्रकारात व अनन्या जोशी हिने ईपीमध्ये, तर आजरा महाविद्यालयाच्या ज्योती सुतार हिने सेबर प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. शिवाजी विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, डी. वाय. पाटील नॉलेज कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. अभिजीत माने आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशनचे सचिव विनय जाधव यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील १३२ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय फेन्सिंग स्पर्धेप्रसंगी मान्यवर व खेळाडू.

## स्पर्धेचा निकाल

**फॉईल गर्ल्स प्रकार**

- **ज्योती सुतार** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर - सुवर्ण
- **तन्वी कुन्हाडे** - जी. ए. कॉलेज सांगली. - रौप्य
- **अनन्या जोशी** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर - कांस्य
- **अनुजा ढबाले** - शिवराज कॉलेज गडहिंग्लज - कांस्य

**सेबर प्रकार मुली**

- **ज्योती सुतार** - आजरा महाविद्यालय - सुवर्ण
- **श्लोका शिंदे** - विवेकानंद कॉलेज - रौप्य
- **स्नेहल पाटील** - विवेकानंद कॉलेज - कांस्य
- **अमृता तराळ** - शिवराज कॉलेज गडहिंग्लज - कांस्य

**ईपी प्रकार मुली**

- **अनन्या जोशी** - विवेकानंद कॉलेज सुवर्ण
- **श्लोका शिंदे** - विवेकानंद कॉलेज - रौप्य
- **श्रेया शिंदे** - शिवराज कॉलेज गडहिंग्लज - कांस्य
- **सानिका कदम** - शिवराज कॉलेज गडहिंग्लज - कांस्य

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र व रसायन अभियांत्रिकीच्या अभ्यास मंडळावर निवड झाल्याबद्दल इस्लामपूर येथील कुसुमताई राजाराम पाटील कन्या महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ. आर. के. माने यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. माने. या वेळी व्ही. डी. सोनवणे, डॉ. एस. आर. शाळगांवकर व इतर.

तरुण भारत

# भगवान महावीर अध्यासनास देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासन इमारतीच्या बांधकामासाठी कुमार पाटील आणि पासगोंडा पाटील यांनी प्रत्येकी दहा हजार रुपयांची देणगी दिली. ही रक्कम डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली. कुमार पाटील हे जयसिंगपूर महाविद्यालयातील भूगोल विषयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत. ही देणगी दिल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. भगवान महावीर अध्यासन इमारतीच्या बांधकामासाठी सर्व दानशूर, अहिंसा प्रेमी व्यक्ती व संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2022
तरुण भारत

# दार्जिलिंगमधील नॉर्थ बंगाल विद्यापीठात स्तुती कार्यक्रम

## कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले मार्गदर्शन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

दार्जिलिंग येथील नॉर्थ बंगाल विद्यापीठात भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित स्तुति कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उपयोग प्राध्यापक, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील व्यक्तींना झाला पाहिजे, असे मत स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी व्यक्त केले. तसेच शिवाजी विद्यापीठात उपलब्ध असलेल्या आधुनिक उपकरणासंदर्भात माहिती दिली.




**कोल्हापूर : दार्जिलिंग येथील नॉर्थ बंगाल विद्यापीठात स्तुती कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आय. आय. टी. खरकपूरचे प्रा. पार्थसारथी चक्रबोर्ती, स्तुति समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे, नॉर्थ बंगाल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ओम प्रकाश मिश्रा, प्रा. सुभाष रॉय, प्रा. पलश पॉल.**

भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि नॉर्थ बंगाल विद्यापीठ, दार्जीलिंग यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुति योजनेंतर्गत कार्यक्रमाचे उद्घाटन केले. हा उपक्रम २८ नोव्हेंबरपर्यंत सात दिवस सुरू राहणार आहे. शांतीस्वरूप भटनागर पुरस्कारार्थी, खरकपूर आय. आय. टी.चे डॉ. पार्थसारथी चक्रबोर्ती, नॉर्थ बेंगाल विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. ओम प्रकाश मिश्रा, डॉ. सुभाष रॉय, डॉ. पलश पॉल आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. पार्थसारथी चक्रबोर्ती म्हणाले, डीएसटीच्या उत्कृष्ट उपक्रमाचा फायदा संशोधक, प्राध्यापकांना होत आहे. स्तुति कार्यक्रमातून भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने कुशल मनुष्यबळ तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. नॉर्थ बंगाल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ओम प्रकाश मिश्रा म्हणाले, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाने संशोधकांना चांगली संधी मिळवून दिली, असे कार्यक्रम यापुढेही होत राहावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रा. सोनकवडे यांच्या प्रयत्नामुळे अनेक शिक्षण संस्थांना स्तुती उपक्रमाचा फायदा होत आहे. स्तुतीचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी स्तुति आणि विज्ञान व तंत्रज्ञान विभागातील योजनांची माहिती दिली. भविष्यातील तांत्रिक विकासाचा विचार करता हा प्रशिक्षण कार्यक्रम महत्वाचा आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाला विशेषत: भारताच्या ईशान्येकडील अंतर्गत भागाशी संपर्क साधायचा होता. त्यामुळे कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले असून चांगला प्रतिसाद मिळाला. भारताच्या ईशान्य क्षेत्राचा जीडीपी वाढण्याकरिता अत्याधुनिक उपकरणांच्या प्रशिक्षणाची गरज आहे. त्यामुळे डॉ. सोनकवडे यांनी नॉर्थ बंगाल विद्यापीठाचे कौतुक केले. या कार्यक्रमाला १२ राज्यांमधून सुमारे ८० संशोधक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. नॉर्थ बंगाल विद्यापीठातील स्तुतीचे समन्वयक प्रा. पलश पॉल यांनी आभार मानले.